# वाढीव वीजदेयक ?

## कृपया हे वाचा

वीज देयकाच्या वाढीव रकमेबाबत तक्रारी आमच्याकडे प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींचे प्रमुख कारण वीजदरात झालेली वाढ हे होय. निवासी वीजग्राहकांचा ज्यांचा वीजवापर ३०० आणि ५०० युनिट पर्यंत आहे अशा वीजग्राहकांचा वीजदेयक रकमेचा जुन्या व नविन दराप्रमाणे तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| वीजदेयक रक्कम | ३०० युनिट | | ५०० युनिट | |
|---|---|---|---|---|
| | जुन्या वीज दराप्रमाणे (रुपये) | १ एप्रिल २०१५ पासूनच्या नविन वीजदराप्रमाणे (रुपये) | जुन्या वीज दराप्रमाणे (रुपये) | १ एप्रिल २०१५ पासूनच्या नविन वीजदराप्रमाणे (रुपये) |
| उर्जा आकार | १३३५ | १५८० | २८३५ | ३३४० |
| विद्युत शुल्क | २२५ | ३०६ | ४६८ | ६३४ |
| महाराष्ट्र कर | ४५ | ४८.१२ | ७५ | ८०.२ |
| इंधन समायोजन आकार | -१६६ | ११३ | -३३६ | २२५ |
| इतर आकार | ३३६ | ३३६ | ६२४ | ६२४ |
| एकुण | १७७५ | २३८३ | ३६६६ | ४९०३ |
| सरासरी वाढ | | ३५% | | ३४% |

सर्वसाधारणपणे ऑक्टोबर महिन्यातील उकाडयामुळे वीज वापर हा वाढत असतो.

ऑक्टोबर महिन्याचे वीज देयक हे दोन महिन्याकरिता प्रत्यक्ष वीजमापक वाचनानुसार तयार करण्यात आले आहे आणि सप्टेंबर २०१५ च्या सरासरी वीजदेयकानुसार प्रदान केलेली रक्कम या वीजदेयकातून वजा करण्यात आली आहे.

काही प्रकरणांमध्ये सप्टेंबर २०१५ मध्ये सरासरी वीजवापरानुसार देण्यात आलेल्या वीजदेयकाची रक्कम देय दिनांकापूर्वी भरली नसल्यामुळे अथवा देय दिनांकानंतर भरली गेली असल्यामुळे सदर रक्कम पुन्हा ऑक्टोबर २०१५ या महिन्याच्या बिलात समाविष्ट झालेली आहे.

ज्या वीजग्राहकांनी पूर्वीचे वीजदेयक प्रदान केले आहे आणि सदर रक्कम ऑक्टोबर २०१५ च्या वीजदेयकात समाविष्ट नसेल अशा वीजग्राहकांनी आधी प्रदान केलेली रक्कम वजा करुन फक्त शिल्लक रक्कम भरावी.

वीजग्राहकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वाढीव वीज देयकासंदर्भात तक्रार करताना वरील गोष्टींचा विचार करावा. वीजग्राहकांचे समाधान न झाल्यास त्यांनी ग्राहक सेवा विभागाच्या संबंधित प्रभागामध्ये संपर्क साधावा आणि त्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी उपक्रमाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे ही विनंती.

बेस्ट उपक्रम